

# परमानंद

आज आळविते ते ,
अंगण ओले ओले ।
भिंती सारवलेल्या
अन् घर ही सारवलेले ॥

उंबऱ्यावरी रांगोळी ,
सडे प्राजक्त फुलांचे ।
सारे सारे प्रसन्न सुंदर ,
वृंदावन ते ऐश्वर्याचे ॥

अंतर्यामी अनुबंधी ,
क्षण आनंदी गोपाळी ।
भाव रंग आत्मीयतेचे ,
सोहळे प्रितीचे भाळी ॥

मैत्र लाघवी सगेसोयरे ,
निर्मोह तत्वी युगांतरीचे ।
परमानंदी ही सौख्यदा ,
सत्य अक्षयी जीवनाचे ॥

वि. ग. सातपुते (भावकवी)
9766544908